

नाशिक येथे बुधवारी गोदाकाठावर भरपावसातच सुरू असलेला आठवडे बाजार. (सकाळ छायाचित्र सेवा)

# भारत- फ्रान्स महोत्सव ३१ पासून रंगणार

नाशिक, ता. २८ : 'भारत- फ्रान्स सांस्कृतिक मंडळ' आणि नाशिकच्या शिवालय नृत्यकला मंदिर या संस्थांतर्फे ३१ जुलैपासून नाशिक येथे 'भारत- फ्रान्स युवा महोत्सव' होणार आहे. उपमहापौर प्रा. शोभना आहेर यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन होत असून, २००४- ०५ या वर्षी या महोत्सवांतर्गत विविध कार्यक्रम सादर होतील.

शनिवारच्या (ता. ३१) उद्‌घाटन सत्रात फ्रान्सच्या क्लेरमॉ- फेरॉंद या शहरातील युवा कलाकार निकोलस दलाईग्यू यांचे सतारवादन व नाशिकचे नितीन पवार यांचे तबलावादन होणार आहे. याच वेळी विविध क्षेत्रांत आपल्या कार्याने ठसा उमटविणारे दहा पाहुणेही उपस्थित राहतील.

निकोलस दलाईग्यू यांनी आपले सतारवादनाचे प्रारंभिक धडे सतारवादक अशोक पाठक व (कै.) बलराम पाठक यांच्याकडून घेतले. नरेंद्र बटजू या श्री. रविशंकर यांच्या पट्टशिष्यांकडून सतारवादनाचे धडे त्यांनी गिरविले. सध्या ते युरोपातील सुप्रसिद्ध संगीततज्ज्ञ डॉ. पॅट्रीक मुताल यांच्याकडून उच्चशिक्षण घेत आहेत. श्री. दलाईग्यू यांचा नाशिकमध्ये होणारा कार्यक्रम हा त्यांचा भारतातील पहिलाच कार्यक्रम आहे.

यानंतरच्या विविध सत्रांत भारतीय संगीतात प्रवीण असलेल्या फ्रेंच युवा कलाकारांचे कार्यक्रम सादर होतील. नोव्हेंबरमध्ये पॅरिसच्या श्रीमती इझा बेल ॲना कथक सादर करतील. डिसेंबरमध्ये ग्रेनोब्लच्या चित्रकार श्रीमती ॲनमारी बारट आणि



भारत-फ्रान्स महोत्सवात निकोलस दलाईग्यू सतारवादन करताना.

इतर युवा चित्रकारांचे चित्रकृती प्रदर्शन होईल. जानेवारी २००५ मध्ये पॅरिसच्या नृत्यांगना मारिया साल्व्हीनी यांचे भरतनाट्यम नृत्य, फेब्रुवारीत मार्सेलचे ग्लेझ दाम्पत्य आणि त्यांचे युवा विद्यार्थी यांचे भरतनाट्यम व फ्रेंच बॅले नृत्य आणि एप्रिलमध्ये फ्रेंच फिल्म फेस्टिवल असा भरगच्च कार्यक्रम आहे. या फ्रेंच युवा कलाकारांबरोबरच नाशिक व भारतातील युवा कलाकार, चित्रकार यांनाही आपल्या कला प्रदर्शनाची संधी दिली जाईल.

'तपोत्सव' अंतर्गत कार्यक्रमांची सुरवात मेमध्ये फ्रान्स येथील विविध शहरांत झाली असून, नाशिकच्या शिवालय नृत्यकला मंदिरातील विद्यार्थ्यांनी आपल्या भरतनाट्यम व लोकनृत्यांचे कार्यक्रम फ्रान्सच्या विविध शहरांत केले आहेत. २८ मे २००४ ला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीदिनी या कलाकारांनी सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे मार्सेल येथील फ्रेंच कलाकारांबरोबर आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. या 'तपोत्सवां'तर्गतच 'भारत- फ्रान्स युवा महोत्सवा'चे नाशिकमध्ये आयोजन होत आहे.

या महोत्सवासाठी पॅरिसच्या मंडपम, त्रिवेणी, इस्त्रारच्या असाली, मार्सेलच्या अरबेस्कू- ए- मुद्राज् (अीरलशीर्शिश- र्शीं- ंिविरी) तसेच अंजली, ग्रेनोब्लच्या मेसॉं- दे- कुलत्युर (चरळीप- वशी- लींश्रींीशी), क्लेरमॉं- फेरांदच्या मेसॉं- दे- असोसियॉंशो (चरळीप- वशी- रींलळरींळेपी) यांचे सहकार्य मिळेल. याशिवाय फ्रेंच सरकारची सांस्कृतिक व शैक्षणिक कार्य करणारी संस्था 'अलियान्स्- फ्रान्सेज' (अश्रश्रळरपलश- षीरपलरळीश) तसेच पॅरिसचे 'इंडिया हाऊस' व 'भारतीय दूतावास' यांचेही मार्गदर्शन मिळणार आहे.

भारत- फ्रान्स सांस्कृतिक मंडळ व शिवालय नृत्यकला मंदिराचे संस्थापक दीपक मगरे यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे संयोजन माधव गाडगीळ, रा. धो. सहस्रबुद्धे, पुष्पा गवांदे, वर्षा मगरे, उल्का मिरजकर, प्रा. प्रभाकर जाधव, प्रा. डॉ. दिलीप जाधव, विष्णूपंत गायखे आदी करीत आहेत.

## ...चाऱ्यांवरील ...ची स्थगिती

... उपलब्ध ('मानीव' ... मिळालेल्या ३५ कर्मचाऱ्यांवर ... न्यायालयात धाव घेतली असून, ... त्यामुळे कारवाई तर नाहीच; ... आहे. माजी आयुक्त जी. एन. ... [illegible]

## कर्जमाफी योजना राबवून शेतकऱ्यांना बॅंकांनी दिलासा द्यावा : झगडे

नाशिक, ता. २८ : दुष्काळी तालुक्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने कर्जमाफीच्या योजना व नवीन धोरण सुरू केले आहे. जिल्ह्यातील बॅंका, सहकारी संस्थांनी त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी महेश झगडे यांनी केले.

नाशिक जिल्हा सहकारी ... नाबार्डचे विभागाचे सहायक प्रबंधक यू. एस. शेवडे, ... बॅंकेचे सहायक प्रबंधक ... शेलार, विविध बॅंकांचे अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

नैसर्गिक आपत्ती व दुष्काळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषि कर्ज व इतर कर्जांचे व्याज कमी करण्याबरोबरच ... अल्पमुदतीची कर्जे दीर्घ मुदतीत रूपांतर करणे, अल्पभूधारक व मध्यम भूधारक शेतकऱ्यांसाठी सहकारी बॅंकांनी ... योजना करून व्याजात माफीसाठी संचालक मंडळाकडे प्रस्ताव पाठवावेत.

सावकारी व खासगी व्यक्तींकडून घेतलेल्या कर्जाबाबत विशेष योजना आखावी, जिल्ह्यातील ... तीन वर्षांत दुप्पट करता येईल याबाबत त्यांनी बॅंक अधिकाऱ्यांशी चर्चा करून जिल्ह्याचा पतपुरवठा ... १३०५.६२ कोटींपर्यंत वाढविण्यात आला. गेल्या वर्षीच्या आराखड्याची दहा टक्के अंमलबजावणी करण्यात आली असून, जिल्ह्यात १२९०.०६ कोटींचे कर्जवाटप करण्यात ...

## पोलिस मित्रांना रविवारी मिळणार विशिष्ट बिल्ला

ठेवण्यास पोलिस यंत्रणेला सहकार्य करणाऱ्या नागरिकांना ... संबोधून त्यांना विशिष्ट प्रकारचा बिल्ला देण्यात येणार आहे.

येत्या एक ऑगस्टला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती आहे. यंदा जयंती उत्साहात साजरी करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला आहे. तसेच सायंकाळी मिरवणुकाही काढण्यात येणार आहेत. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर भद्रकाली पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक झाली. त्या वेळी पोलिसमित्रांची संकल्पना समोर आली आहे. मिरवणुकीत सहभागी ...